Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ६, अंक १० ] शनिवार, फेब्रुवारी २९, २०२०/फाल्गुन १०, शके १९४१ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १८.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (असा.) (ना.वि.पु.) म.शा.रा., अ. क्र. ३५.

**अध्यक्षा, नगर पंचायत, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ (१) अन्वये नगर पंचायत, हिंगणा क्षेत्राची प्रारूप विकास योजना प्रसिद्धीबाबतची सूचना**

क्रमांक प्रा.वि.यो.न.पं.हिंगणा-कलम-२६-प्रसिद्धीकरण-ससंनाग-५२७-२०२०.—

ज्याअर्थी, मौजा हिंगणा, ता. हिंगणा हे महसुली गाव नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-१८९९-१९९१-प्र.क्र.८०-९८-९९-नवि-१३, दिनांक २३-०७-१९९९ अन्वये नागपूर महानगर प्रदेश म्हणून घोषित केलेल्या क्षेत्रात समाविष्ट होते. सदर महानगर क्षेत्राकरीता शासन अधिसूचना क्रमांक टिपीएस-२४०९-२८९०-प्र.क्र.३३६-०९-नवि-९, दिनांक ३१-०८-२०१० अन्वये नागपूर सुधार प्रन्यासला विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित करण्यात आलेले होते ;

आणि ज्याअर्थी, शासन निर्णय क्रमांक NMRDA-३३१६-CR-५५-UD-७, दिनांक ०४-०३-२०१७ अन्वये उक्त महानगर प्रदेश क्षेत्राकरीता, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना विकास प्राधिकरण म्हणून घोषित करण्यात आले आणि उक्त महानगर प्रदेश क्षेत्राची विकास योजना शासन निर्णय क्रमांक टिपीएस-२४१६-प्र.क्र.२२अ-२०१६-नवि-९, दिनांक ०५-०१-२०१८ अन्वये मंजूर झालेली होती ;

आणि ज्याअर्थी, शासनाची अधिसूचना क्रमांक एमयुएन-२०१४-प्र.क्र.९८-नवि-१८, दिनांक १९-०३-२०१५ अन्वये नागपूर जिल्ह्यातील मौजा हिंगणा या महसुली गावाचे क्षेत्राकरीता नगर पंचायत, हिंगणा गठित केलेली आहे आणि उक्त महानगर प्रदेश क्षेत्राच्या विकास योजनेतील अंतर्भूत नवनिर्मित हिंगणा नगर पंचायतीचे क्षेत्र, सारभुत स्वरूपाचा फेरबदल क्रमांक SM-१० अन्वये वगळण्यात आलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, नियोजन प्राधिकरण म्हणून हिंगणा नगर पंचायतीने सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ७, दिनांक २०-०२-२०१७ अन्वये दिलेल्या मंजुरीनुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(१) अन्वये [कलम २१(२) सह] प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून नगर पंचायतीच्या मूळ हद्दीमध्ये अंतर्भूत मौजा हिंगणा या क्षेत्राची विकास योजना तयार करण्याचा इरादा महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक-अ नागपूर विभागीय पुरवणी, दिनांक १८-२४ मे, २०१७ मध्ये तसेच दैनिक "लोकमत" (मराठी) व दैनिक "लोकमत टाईम्स" (इंग्रजी) या वृत्तपत्रात दिनांक १० मे २०१७ रोजी प्रसिद्ध केला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २४ अन्वये नेमलेल्या नगर रचना अधिकारी यांनी उपरोक्त क्षेत्रातील विद्यमान जमीन वापर नकाशा उक्त अधिनियमाचे कलम २५ अन्वये नियोजन प्राधिकरणास (नगर पंचायत, हिंगणा) दिनांक ०३-०४-२०१८ रोजी हस्तांतरीत केलेला आहे. आणि प्रारूप विकास योजना दिनांक १३-०२-२०२० रोजी हिंगणा नगर पंचायतीस उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये प्रसिद्ध करणेस्तव सादर केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, हिंगणा नगर पंचायतीचे विशेष सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक १, दिनांक १७-०२-२०२० अन्वये हिंगणा नगर पंचायतीने प्रारूप विकास योजनेत काही बदल दर्शवून प्रारूप विकास योजना व अहवालास उक्त अधिनियमाच्य कलम २६(१) अन्वये प्रसिद्ध करणेस्तव मंजुरी दिलेली आहे.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून हिंगणा नगर पंचायत क्षेत्राची विकास योजना व अहवाल तयार करण्यात आलेला आहे. ज्याकरीता राजपत्रात नोटीस प्रसिद्ध केल्यापासून तीस (३०) दिवसांच्या कालावधीत जनतेकडून सूचना / आक्षेप मागविण्यात येत आहेत. सूचना / आक्षेप मुख्याधिकारी, नगर पंचायत, हिंगणा यांचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत पोहचणे आवश्यक आहे. जेणेकरून उक्त विकास योजना उक्त अधिनियमाचे कलम ३० अन्वये शासनास मंजुरीस्तव सादर करणेपूर्वी प्राप्त आक्षेप/सूचनांवर आवश्यक विचार होईल. तसेच उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये उक्त प्रारूप विकास योजना नकाशा व अहवालाची प्रत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत जनतेस निरीक्षणासाठी, उक्त सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून तीस (३०) दिवसांपर्यंत खालील कार्यालयात उपलब्ध असेल.

(१) मुख्याधिकारी, नगर पंचायत कार्यालय, हिंगणा.

(२) सहाय्यक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, प्रशासकीय इमारत क्र. १, दुसरा माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर.

**सौ. छायाताई भोस्कर,**
अध्यक्षा,
नगर पंचायत, हिंगणा.

हिंगणा :
दिनांक २८ फेब्रुवारी २०२०.

---

भाग १-अ (असा.) (ना.वि.पु.) म.शा.रा., अ. क्र. ३६.

BY PRESIDENT, NAGAR PANCHAYAT

**Publication of Draft Development Plan of Hingna Nagar Panchayat U/s 26(*1*) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966**

No. DDPNPH-Sec-26-Publication-ADTPN-527-2020.—

Whereas, Government of Maharashtra, Urban Development Department *vide* Notification No. TPS-1899-1991-C.R.80-98-99-UD-13, dated 23-07-1999 constituted Nagpur Metropolitan Area and *vide* Notification No. TPS-2409-2890-C.R.-336-09-UD-9, dated 31-08-2010 appointed Nagpur Improvement Trust as Special Planning Authority for said area. Revenue Area of Mauza Hingna, Ta. Hingna, Distt. Nagpur was included in above said Metropolitan Area ;

And whereas, Government of Maharashtra *vide* Notification No. NMRDA-3316-CR-55-UD-7, dated 04-03-2017 appointed Nagpur Metropolitan Region Development Authority as Development Authority for above area. The Development Plan of said Metropolitan Area was sanctioned by Government *vide* Notification No. TPS-2416-C.R.-22A-2016-UD-9, dated 05-01-2018 ;

And whereas, Government of Maharashtra *vide* Notification No. MUN-2014-C.R.-98-UD-18, dated 19-03-2015 included the area of revenue village of Mouza Hingna in Nagar Panchayat, Hingna. The said revenue area of newly formed Hingna Nagar Panchayat was excluded from above said Development Plan of Metropolitan Area, by Modification No. SM-10 of Excluded Part of above Development Plan ;

And whereas, Planning Authority, Nagar Panchayat, Hingna *vide* Resolution No. 7, dated 20-02-2017 declares the intention u/s 23(*1*) alongwith Section 21(*2*) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 to prepare the Development Plan of area included in Hingna Nagar Panchayat boundary. And it was published in Government Gazette Part-1A, Nagpur Division, Nagpur, on dated 18-24 May, 2017 and daily newspaper " Lokmat " (Marathi) and " Lokmat Times" (English) on dated 10-05-2017 ;

And whereas, Town Planning Officer, appointed under Section 24 of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 handed over the Existing land Use Map of Nagar Panchayat, Hingna boundary to Planning Authority (Nagar Panchayat, Hingna ) on date 03-04-2018 and Draft Development Plan submitted for publication u/s 26(*1*) of above said Act on date 13-02-2020 to the Planning Authority ;

And whereas, the General Body of Nagar Panchayat, Hingna *vide* Resolution No.1, date 17-02-2020 has approved the Draft Development Plan with few modifications alongwith its report for publication under Section 26(*1*) of the above said Act.

Now, therefore, in exercise of the powers conferred under sub-section (*1*) of Section 26 of the above said Act and of all other powers enabling in this behalf, Nagar Panchayat, Hingna hereby give notice that the Draft Development Plan of Nagar Panchayat, Hingna alongwith its report have been prepared and published under Section 26(*1*) of the above said Act, for which objections/suggestions are invited from the public for a period of thirty (30) days from the publication of this notice in the Official Gazette. The objections/suggestions shall be submitted to the Chief Officer, Nagar Panchayat, Hingna, Ta. Hingna, Distt. Nagpur in office hours on all working days so as to consider before submitting the Draft Development Plan to the Government for final sanction u/s 30 of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.

Further in pursuance of sub-section (*1*) of Section 26 of the above said Act, a copy of aforesaid Draft Development Plan alongwith its report are available for inspection during working hours on all working days in the following offices for a period of thirty (30) days from publication of this notice in the Official Gazette.

(1) Chief Officer, Nagar Panchayat, Hingna, Ta. Hingna, Distt. Nagpur.

(2) Assistant Director of Town Planning, Branch Office, 2nd Floor, Administrative Building No. 1, Civil Lines, Nagpur.

Sau. CHHAYATAI BHOSKAR,
President,
Nagar Panchayat, Hingna.

Hingna :
Dated the 28th February 2020.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.